# पुणे विद्यापीठ
## राष्ट्रीय सेवा योजना

गणेशखिंड, पुणे - ४११ ००७.

डॉ. शाकेरा इनामदार
एम्.एस्सी.,पीएच्.डी.
कार्यक्रम समन्वयक

कार्यालय क्र. : ०२०-२५६९७३४१
०२०-२५६०११५३
०२०-२५६०११६०
फॅक्स क्र. : ०२०-२५६९७३४१
मोबाईल : ९८२२ ७० ७० ६१


संदर्भ : रासेयो /३६५/१२

दि.२५/१०/२०१२

**प्रती,**
**मा. प्राचार्य/कार्यक्रम अधिकारी**
रासेयो संलग्न सर्व महाविद्यालये
पुणे शहर

**विषय : दि. १ नोव्हेंबर२०१२ – पुणे 'बस डे' विशेष**

**महोदय,**

शहरातील सार्वजनिक वाहतूक बळकटीकरणाची गरज स्पष्ट करण्यासाठी सकाळ समुह यांच्यातर्फे पुणे व पिंपरी-चिंचवड शहरामध्ये दि. १ नोव्हेंबर २०१२ रोजी बस डे साजरा करण्यात येणार असुन या उपक्रमास पुणे विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने बस थाब्यांची स्वच्छता, पोलीस मित्र अशा प्रकारचे सहकार्य करण्यात येणार आहे.

त्या प्रमाणे सदर उपक्रम दोन विभागात राबविण्यात येणार असून त्यामध्ये दि. २९ ते ३१ ऑक्टोबर १२ या कालावधीत शहरातील सर्व बस स्थानके व बस थांबे या ठिकाणी स्वच्छता अभियान राबविण्यात येणार आहे. व दि. १ नोव्हेंबर २०१२ रोजी पुणे बस डे साजरा करण्यात येणार आहे. त्यामध्ये या दिवशी सर्वांनी बसने प्रवास करुन रासेयो मार्फत या उपक्रमास प्रतिसाद द्यावा.

तरी आपण सदर उपक्रम यशस्वी करण्याकरीता आपल्या महाविद्यालयाच्या नजिकच्या सर्व बस थांब्यांवर दि. २९ ते ३१ ऑक्टोबर २०१२ या कालावधीत रासेयो स्वयंसेवकांमार्फत स्वच्छता करण्याविषयी व ज्या स्वयंसेवकांनी गणेशोत्सव काळात पोलीस मित्र प्रशिक्षण घेतलेले आहे अशा स्वयंसेवकांनी दि. १ नोव्हेंबर २०१२ रोजी बस थाब्यांवर पोलीस मित्र गणवेशात वाहतूक विभागातील पोलिसांबरोबर पोलीस मित्र म्हणून काम करण्याविषयी आपल्या महाविद्यालयातील रासेयो कार्यक्रम अधिकारी व स्वयंसेवक यांना सुचित करुन मार्गदर्शन करावे.

तसेच दि. १ नोव्हेंबर २०१२ रोजी आपल्या महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी, प्राध्यापक यांना बसने प्रवास करण्याचे आवाहन करावे ही विनंती.

कळावे, धन्यवाद!

**आपली विश्वासू,**

**कार्यक्रम समन्वयक,**
**राष्ट्रीय सेवा योजना**

Pc-2/D/Tin Job/Daily Letter/ 18